ePaper


## 'होर्मुझ' बंद होताच 'या' देशाला लागली लॉटरी!



वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

WWW.MAHAENEWS.COM | रविवार, दि. 26 एप्रिल 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



पान 3 वरुन...

ई-चार्जिंग सवलतीवर प्रश्न; सोसायट्यांना लाभ कधी?

## १ मे रोजी 'मिसिंग लिंक'चे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

# मुंबई - पुणे प्रवास होणार सुसाट!

महाईन्यूज । मुंबई

**बहुप्रतीक्षित मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील मिसिंग लिंक प्रकल्पाचे १०० टक्के काम पूर्ण झाले असून चाचण्याही यशस्वी झाल्या आहेत. त्याचवेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लोकार्पणासाठी १ मेची तारीख निश्चित करून त्यासाठी वेळ दिला आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने (एमएसआरडीसी) लोकार्पणाच्या तयारीला वेग दिला आहे. खोपोली येथील बोगद्यात १ मे रोजी लोकार्पणाचा कार्यक्रम होणार आहे. मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत लोकार्पण होणार असून त्यानंतर ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल होणार आहे. ही मार्गिका वाहतूक सेवेत दाखल झाल्यास मुंबई-पुणे प्रवासाचा कालावधी ३० मिनिटांनी कमी होणार आहे. त्यामुळे ही प्रवाशांसाठी मोठा दिलासा देणारी बाब ठरणार आहे.**



मुंबई – पुणे द्रुतगती महामार्गावरील वाहतूक कोंडीचा प्रश्न सोडविण्यासाठी आणि मुंबई-पुणे प्रवास आणखी जलद करण्यासाठी एमएसआरडीसीने खोपोली – कुसगाव दरम्यान १३.३ किमी लांबीची नवीन मार्गिका बांधण्याचा निर्णय घेतला. ही मार्गिका म्हणजेच मिसिंग लिंक. या मिसिंग लिंकच्या कामाला २०१९ मध्ये दोन टप्प्यांत सुरुवात करण्यात आली. हे काम २०२१ मध्ये पूर्ण होऊन ही मार्गिका सेवेत दाखल होणे अपेक्षित होते. मात्र अनेक कारणांमुळे या मार्गिकेला विलंब झाला असून अजूनही ही मार्गिका सेवेत दाखल झालेली नव्हती. पण एमएसआरडीसीने एप्रिल २०२६ अखेर प्रकल्पाचे काम पूर्ण करून १ मे २०२६ रोजी मिसिंग लिंक सेवेत दाखल करण्याचे जाहीर केले.

त्यानुसार पाच-सहा महिन्यांपासून कामाला वेग दिला. मार्चअखेरीस ९५ टक्क्यांहून अधिक काम पूर्ण झाले. मात्र अमेरिका, इस्त्रायल – इराण युद्धाचा फटका या प्रकल्पालाही बसला. प्रकल्पाच्या अंतिम टप्प्यातील कामासाठी डांबरच उपलब्ध होत नसल्याने एमएसआरडीसीच्या अडचणी वाढल्या. परिणामी, १ मेचा मुहूर्त चुकणार, अशी परिस्थिती निर्माण झाली. यासंबंधीचे वृत्तही प्रसिद्ध झाले. मात्र कोणत्याही परिस्थितीत १ मेचा मुहूर्त गाठायचे उद्दिष्ट आमच्यासमोर होते. त्यानुसार मोठ्या प्रयत्नांनी डांबर उपलब्ध करून आता १०० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे. तर वजनासंबंधीच्या चाचण्याही यशस्वी झाल्या आहेत. त्यामुळे आम्ही मुख्यमंत्र्यांकडे लोकार्पणासाठी वेळ मागितली होती. मुख्यमंत्र्यांनी १ मेची वेळ दिली आहे. तेव्हा १ मे रोजी मिसिंग लिंकचे लोकार्पण होणार असल्याची माहिती एमएसआरडीसीचे व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी दिली.

मिसिंग लिंकच्या लोकार्पणाचा मुहूर्त निश्चित झाला असून लोकार्पणाच्या सोहळ्याची जय्यत तयारी एमएसआरडीसीकडून सुरू आहे. खोपोली येथील बोगद्यात लोकार्पणाचा कार्यक्रम पार पडणार आहे. लोकार्पणानंतर काही तासांनी मिसिंग लिंक वाहतुकीसाठी खुली केली जाणार आहे. त्यामुळे मुंबई-पुणे अतिजलद प्रवासाची प्रवाशांची, वाहनचालकांची प्रतीक्षा १ मेला संपुष्टात येणार आहे. मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील घाटातील प्रवास टाळून ३० मिनिटांची प्रवासाच्या वेळेची बचत करून प्रवास करता येणार आहे. त्यामुळे मुंबई – पुणे प्रवास दीड ते पावणे दोन तासांत करणे शक्य होणार आहे.

### अतिजलद आणि सुरक्षित प्रवास

महामार्गावरील प्रवास ६ किमीने कमी होणार आहे. त्यामुळे ३० मिनिटांची बचत होणार असून प्रवास अतिजलद होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे या मार्गिकेवर स्फोटके, ज्वलनशील पदार्थ वाहून नेणाऱ्या वाहनांना प्रवेशबंदी असणार आहे. त्यामुळे या मार्गिकेवरील प्रवास अधिक सुरक्षित होणार आहे. वायू गळती, स्फोटके आदींमुळे होणारा स्फोट, अशा प्रकारच्या दुर्घटनांची भीती येथे नसणार आहे. काही दिवसांपूर्वी महामार्गावर झालेल्या टँकर अपघातानंतर महामार्गावरील वाहनांच्या, प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. पण मिसिंग लिंकवरील प्रवास अतिजलद प्रवासाबरोबर सुरक्षित असणार असल्याचा दावा एमएसआरडीसीकडून करण्यात आला आहे.

# हमी देऊनही पाणी न पुरवणाऱ्या बिल्डरांकडून टँकरचे पैसे घ्या

## प्रशासकीय राजवटीत मंजूर झालेल्या २० रस्ते कामांच्या गुणवत्तेवर प्रश्नचिन्ह

महाईन्यूज । पुणे

**गृहप्रकल्पांना मंजुरी घेताना महापालिकेचा पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र भरून देणारे; पण नंतर ती हमी न पाळणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांवरून पुणे महापालिकेची झालेली सर्वसाधारण सभा गाजली. पाणीपुरवठा न करणाऱ्या व्यावसायिकांकडून टँकरचे शुल्क वसूल करावे, यासह अनेक मागण्या, तक्रारी सभेत मांडण्यात आल्या.**




गृहप्रकल्पांना मंजुरी घेताना महापालिकेचा पाणीपुरवठा सुरळीत होईपर्यंत पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र बांधकाम व्यावसायिक भरून देतात. इमारतीला महापालिकेची मान्यता असल्याने नागरिक विश्वासाने गृहप्रकल्पांमध्ये सदनिका घेतात. मात्र, त्यानंतर बांधकाम व्यावसायिक पाणीपुरवठ्याची हमी विसरतात.

पिण्याच्या पाण्याची गरज भागविण्यासाठी प्रत्येक महिन्याला सोसायटीधारकांना तीन ते चार लाख रुपये टँकरसाठी खर्च करावे लागतात. हमीपत्र देऊनही पाणीपुरवठा न करणाऱ्या बांधकाम व्यावसायिकांकडून टँकरचे शुल्क वसूल करावे, अशी मागणी करून सर्वसाधारण सभेत सर्वपक्षीय सभासदांनी प्रशासनाला धारेवर धरले.

'ज्या सोसायटींना महापालिका पाणी देण्यास अपयशी ठरत आहे, अशा सोसायट्यांना पाणीपट्टीत तसेच मिळकतकरात सूट देण्याबाबतचे धोरण तयार करून सर्वसाधारण सभेत ठेवले जाईल,' असे आश्वासन महापालिका प्रशासनाने सर्वसाधारण सभेत दिले.

पुणे महापालिकेच्या 'समान पाणीपुरवठा योजनेचे काम पूर्ण होत नाही. पाण्याच्या टाका बांधलेल्या असतानाही पुरसे पाणी येत नाही. पूर्ण दाबाने पाणी कधी मिळणार,' अशी विचारणा करत महापालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपसह विरोधी पक्षांच्या सदस्यांनी प्रशासनाला जाब विचारला.

'पाणीपुरवठा करण्याचे हमीपत्र, शपथपथ दिलेल्या किती बांधकाम व्यावसायिकांवर महापालिकेने कारवाई केली आहे,' असा प्रश्न नगरसेवक सचिन दोडके यांनी सभागृहात विचारला. दोडके म्हणाले, 'महापालिकेचे पाणी पोहोचू शकत नाही, तोपर्यंत संबंधित बिल्डर स्वखर्चाने पाणी देण्याचे शपथपत्र महापालिकेस देतो. दरम्यान, ताबा मिळाल्यानंतर पाणी पुरविण्याबाबत बिल्डर हात झटकतात.

यामुळे शहरातील अनेक सोसायट्यांना पिण्याच्या पाण्याची गरज भागवण्यासाठी टँकरवर कोट्यवधी रुपये खर्च करावे लागत आहेत. ज्या बिल्डरांनी शपथपत्राचे उल्लंघन केले आहे, त्यांच्याकडून टँकरची बिले वसूल करून त्यांना दणका द्यावा.' नगरसेवक अरविंद शिंदे, पृथ्वीराज सुतार यांनी देखील यामध्ये सहभाग घेतला.

सर्वसाधारण सभेत उपस्थित केलेल्या प्रश्नांवर उत्तर देताना शहर अभियंता अनिरुद्ध पावसकर म्हणाले, 'शहराची व्याप्ती वाढत असून सद्यःस्थितीमध्ये शहर ५०० चौरस किमीपर्यंत गेले आहे. यामुळे पायाभूत सुविधांवर मोठा ताण आहे. 'अमृत' योजना आणि समान पाणीपुरवठा योजनेचे काम नवीन गावांमध्ये पाच ठिकाणी सुरू आहे. मात्र, हे जाळे पूर्ण होण्यास काही कालावधी लागणार आहे.'

'प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर नागरिकांना पाणी मिळत नाही. त्यामुळे नागरिकांची फसवणूक टाळण्यासाठी बांधकाम व्यावसायिकां महापालिकेकडे दिलेली पाणीपुरवठ्याची हमीपत्रे आता महापालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांना खरी परिस्थिती कळेल. तसेच, जे बांधकाम व्यावसायिक महापालिकेच्या नियमांचे पालन करत नाहीत, त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यासाठी प्रशासन नवीन धोरण निश्चित करत आहे. त्यानुसार धोरण केले जाईल,' असे ते म्हणाले.

### 'प्रशासनाने आतापर्यंत काय केले?'

शहरातील अनेक बांधकाम व्यावसायिकाकडून सोसायट्यांना पाणी पुरवठा होत नसल्याच्या तक्रारी नगरसेवकांनी सभागृहात घेतली. अनेक सभासद आक्रमक देखील झाले. या भूमिकेची दखल घेत महापौर मंजूषा नागपुरे यांनी प्रशासनाला कडक शब्दांत सुनावले. तसेच शहरातील पाणीपुरवठा आणि बांधकाम व्यावसायिकांनी दिलेल्या प्रतिज्ञापत्रांबाबत प्रशासनाने आतापर्यंत काय केले आणि भविष्यात काय करणार, याचे संपूर्ण धोरण तयार करून सभागृहासमोर ठेवावे, असे आदेश महापौर नागपुरे यांनी महापालिका प्रशासनाला दिले.

# हापूस आंब्याच्या दरात मोठी घसरण; आवक वाढली

महाईन्यूज । पुणे

**अक्षय तृतीयेनंतर दुसऱ्या टप्प्यात कच्च्या हापूस आंब्याची आवक वाढली असून, वाढत्या उष्णतेमुळे पिकण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. त्यामुळे मागील पाच दिवसांत आंब्याच्या दरात निम्म्याने घसरण होऊन 1 हजार ते 1 हजार 500 रुपये डझन असलेला दर सध्या 500 ते 800 रुपयांवर आला आहे. वाढलेल्या पुरवठ्यामुळे आंबा सर्वसामान्यांच्या आवाक्यात आल्याची माहिती व्यापाऱ्यांनी दिली.**



यंदा लहरी हवामानामुळे आंब्याच्या पहिल्या टप्प्यातील उत्पादनावर विपरीत परिणाम होऊन अपेक्षित आवक होताना दिसत नाही. त्यामुळे घाऊकसह किरकोळ बाजारात आंब्याचे दर चढेच होते. कोकणपट्ट्यातून पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या फळबाजारात दररोज जवळपास दहा हजार पेट्या, तर कर्नाटकातून दोन ते अडीच हजार पेट्यांमधून आंबा दाखल होत होता.

मात्र, अक्षय तृतीयेनंतर कोकणातील देवगड, संगमेश्वर, पावस, राजापूर, सावंतवाडी आदी भागांतून हापूस आंब्याची आवक दुपटीने वाढली आहे. त्यात उष्णतेमुळे परिपक्व होण्याची प्रक्रियाही वाढीला लागल्याने बाजारात आंबा मुबलक उपलब्ध असल्याने खरेदीदारांनीही हापूसच्या खरेदीस सुरुवात केल्याचे चित्र आहे.

> “ कोकणातून मोठ्या प्रमाणात माल येत असून, वाढत्या उष्णतेमुळे आंबा लवकर पिकत आहे. त्यामुळे पुरवठा वाढल्याने दरात नैसर्गिक घट झाली आहे. गेल्या काही दिवसांत दर जवळपास निम्म्यावर आले आहेत.
>
> - युवराज काची, हापूस आंब्याचे व्यापारी.

# मद्यधुंद व्यक्तीकडून बस 'हायजॅक'चा प्रयत्न

महाईन्यूज । पुणे

शहरातील डेक्कन परिसरात शनिवारी दुपारी मोठा थरार पाहायला मिळाला. एका मद्यधुंद व्यक्तीने सार्वजनिक वाहतुकीची बस पळवून नेल्याची धक्कादायक घटना घडली. महाराष्ट्र बँक चौकाजवळून सुरू झालेला हा प्रकार गुडलक चौक, कारंजी मार्गे पुन्हा डेक्कन बस स्थानकापर्यंत पोहोचला. या घटनेमुळे परिसरात काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते.

अधिकच्या माहितीनुसार, कलाकार कट्ट्यावर सुरू असलेल्या आंदोलनामुळे त्या भागात पोलीस आणि पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत पोलिसांनी तत्काळ पाठलाग करून संबंधित बस अडवली आणि चालकाला ताब्यात घेतले. पोलिसांच्या या वेगवान कारवाईमुळे मोठा अनर्थ टळला.

या घटनेमुळे २०१२ मधील कुप्रसिद्ध संतोष माने प्रकरणाची आठवण ताजी झाली. २५ जानेवारी २०१२ रोजी संतोष माने याने स्वारगेट येथून एसटी बस पळवून शहरात भीषण हल्ला केला होता. त्या घटनेत ९ जणांचा मृत्यू झाला होता, तर २७ जण जखमी झाले होते. तसेच अनेक वाहनांचेही मोठे नुकसान झाले होते. सुदैवाने, डेक्कनमधील ताज्या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, शहरातील सुरक्षेच्या दृष्टीने हा प्रकार गंभीर मानला जात असून पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

# पिंपरीत 60 कोटींचा आर्थिक घोटाळा; मुख्य लेखा अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल करण्याची मागणी...

## प्राथमिक अहवालात प्रवीण जैन दोषी, महापौरांचा आयुक्तांना इशारा

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

**बोगस उपसूचनांच्या आधारे अर्थसंकल्पातील तरतुदींमध्ये वाढ आणि घट करून 60 कोटी रुपयांची बिले ठेकेदारांना परस्पर अदा करण्यात आल्याच्या घोटाळ्याप्रकरणी प्राथमिक अहवालात मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रवीण जैन दोषी आढळून आले आहेत. त्यामुळे त्यांच्यावर तत्काळ फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी महापौर रवी लांडगे यांनी आयुक्तांकडे केली आहे. गुन्हा दाखल न केल्यास आम्ही सर्व प्रमुख पदाधिकारी जैन यांच्यावर गुन्हा दाखल करू, असा इशाराही महापौरांनी दिला आहे.**



### मानधनावर नगर सचिव नेमणार

20 एप्रिलच्या तहकूब केलेल्या सर्वसाधारण सभेच्या विषयपत्रावर सन 2026-27 च्या अर्थसंकल्पाला मान्यता देण्याचा कोणताही विषय नसताना सुधारित अर्थसंकल्पाला मान्यता दिल्याचे महापौर रवी लांडगे यांनी जाहीर केले होते. त्यावर दैनिक पुढारीने सभा कामकाजात विषय नसताना महापौरांकडून उपसूचनांना मंजुरी, असे ठळक वृत्त 22 एप्रिलला प्रसिद्ध केले होते. त्यामुळे अडचणीत आलेल्या महापौरांनी त्याच दिवशी चूक झाल्याचे मान्य करून सुधारणा करणार असल्याचे सोशल मीडियाच्या माध्यमातून स्पष्ट केले. परंतु, नगर सचिवांनी सभेच्या कार्यपद्धतीची माहिती दिली नसल्याचा आरोपही त्यांनी केला होता. आता नगर सचिव म्हणून कार्यरत असलेले सहायक आयुक्त मुकेश कोळप यांची गच्छंती करण्याचा निर्णय महापौरांनी घेतला आहे. त्यांच्या जागी महापालिकेचे निवृत्त अतिरिक्त आयुक्त तथा नगर सचिव उल्हास जगताप यांची नगर सचिव म्हणून मानधन तत्त्वावर नेमणूक करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत.

महापौर लांडगे यांची शुक्रवार (दि. 24) पत्रकार परिषद झाली. या वेळी उपमहापौर शर्मिला बाबर, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे, विरोधी पक्षनेते भाऊसाहेब भोईर, नगरसेवक कुणाल वाव्हळकर आदी उपस्थित होते. प्रवीण जैन यांनी स्थायी समिती आणि सर्वसाधारण सभेचा अवमान केला आहे. त्यांनी मान्यता न घेता बोगस उपसूचनांच्या आधारे बिले दिली आहेत. तब्बल 60 कोटी रुपयांचे प्रकरण माफ करण्यासारखे नाही. जैन यांची कार्यपद्धती चुकीची आहे. उपसूचना योग्य आहे की, नाही याची तपासणी करणे आवश्यक होते. चुकीचा कारभार करण्यास कोणी भाग पाडले असेल, तर जैन यांनी त्यांची नावे जाहीर करावीत, असे थेट आव्हान महापौरांनी दिले आहे.

पाच सदस्यीय समितीने दिलेल्या प्राथमिक चौकशी अहवालात जैन दोषी आढळून आले आहेत. आर्थिक घोटाळा झाल्याने आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी तात्काळ जैन यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावा. आयुक्तांनी गुन्हा न दाखल केल्यास आम्ही प्रमुख पदाधिकारी जैन यांच्यावर गुन्हा दाखल करू. जैन यांच्यावर कारवाई होत नाही, तोपर्यंत शांत बसणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला. स्थायी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे म्हणाले की, प्राथमिक चौकशी अहवालात जैन हे दोषी असल्याचे आयुक्तांनी मान्य केले आहे.

# ई-चार्जिंग सवलतीवर प्रश्न; सोसायट्यांना लाभ कधी?

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शहर प्रदूषणमुक्त व्हावे, यासाठी पिंपरी-चिंचवड महापालिकेकडून नागरिकांनी ई वाहनांचा वापर करावा, यासाठी आवाहन केले जात आहे; तसेच या गाड्यांसाठी लागणारे चार्जिंग स्टेशन वैयक्तिक अथवा गृहनिर्माण सोसायट्यांनी उभारावेत म्हणून मिळकत करात सवलत लागू केली. यानुसार, शहरातील गृहनिर्माण सोसायट्यांनी ई चार्जिंग पॉइंट उभारले; परंतु काही गृहनिर्माण सोसायट्यांना महापालिकेकडून करसवलत मिळाली नसल्याचे या सोसायटीधारकांचे म्हणणे आहे.**

### दोन ते पाच टक्क्यांची सवलत


महापालिकेच्या वतीने ई वाहनांसाठी चार्जिंग स्टेशन उभारणाऱ्या मालमत्ताधारकांना 2 टक्के सवलत दिली जाते. यासोबतच जिम व क्लब हाऊस उभारणाऱ्यांना गृहनिर्माण संस्थांना 5 टक्के सवलत महापालिकेकडून जाहीर करण्यात आली आहे.



शहरात पेट्रोल, डिझेलवरील वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. यामुळे शहर प्रदूषणात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याचे मत अनेक पर्यावरणप्रेमींनी व्यक्त केले. त्यामुळे संपूर्ण राज्यात ई वाहनांचा वापर वाढावा म्हणून राज्य सरकार आणि महापालिकेने मिळकत करात दोन ते पाच टक्क्यांची सवलत लागू केली आहे.

यासाठी राज्याच्या नगरविकास विभागाने ऑगस्ट 2021 रोजी ई वाहन धोरण जाहिर केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांना अंमलबजावणीचे आदेश दिले. या आदेशानुसार तत्कालीन आयुक्तांनी पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन आणि कर विभागास हे धोरण शहरात राबविण्याचे सांगितले; तसेच नागरिकांना या योजनेचा लाभ घेण्याविषयी आवाहनही केले.

पिंपरी-चिंचवड शहरामध्ये चार हजारांहून अधिक गृहनिर्माण सोसायट्या नोंदणीकृत आहेत. दवर्षी या सोसायट्या करोडो रुपयांचा कराचा भरणा महापालिकेला करतात. शहरातील प्रदूषण नियंत्रणात ठेवणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे भान राखत महापालिकेने लागू केलेल्या सवलतीचा लाभ मिळावा यासाठी अनेकांनी आपआपल्या सोसायट्यांत इ चार्जिंग उभारले. मात्र काही सोसायट्यांना याच लाभ वर्षानुवर्षे मिळत नसल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे मिळकत करातील ही सवलत संबंधित सोसायट्यांतील सभासदांना कधी मिळणार, असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.



### पिंपळे सौदागरमधील सोसायटीची दखल नाही

तीन वर्षांपासून येथील पार्क रॉयल सोसायटीत चार्जिंग स्टेशन उभारण्यात आले. यामध्ये चारचाकी आणि दुचाकीसाठी वेगवेगळे चार्जिंग पॉइंट उभारले; परंतु दरवर्षी सवलत दिली जाईल, असे आवाहन महापालिकेचे अधिकारी करतात. मात्र, केवळ सवलतीचे आश्वासनच संबंधित अधिकाऱ्यांकडून दिले जात असल्याचे सोसायटीधारक सांगतात.

# बदलाची चाहूल की स्थैर्याचा कौल?



भूमिका



**मतदानाची टक्केवारी हा केवळ सांख्यिकीय आकडा नसून तो त्या राज्याच्या राजकीय संस्कृतीचा आरसा असतो. अलीकडील निवडणुकांमध्ये पश्चिम बंगाल आणि तामिळनाडू या दोन राज्यांतील मतदानाचा कल पाहता भारतीय लोकशाहीतील विविध छटा स्पष्टपणे दिसून येतात.**

एका बाजूला तीव्र स्पर्धा, ध्रुवीकरण आणि अस्थिरतेची चाहूल देणारे बंगाल, तर दुसऱ्या बाजूला स्थिर, संघटित आणि परिपक्व राजकारणाचे प्रतीक असलेले तामिळनाडू—ही तुलना केवळ आकड्यांची नसून मानसिकतेची आहे. पश्चिम बंगालमध्ये विक्रमी मतदान हे केवळ लोकांचा उत्साह दर्शवत नाही, तर त्यामागे दडलेली राजकीय अस्वस्थताही अधोरेखित करते. तृणमूल काँग्रेस आणि भाजप यांच्यातील थेट संघर्ष, स्थानिक पातळीवरील तणाव, तसेच मतदार यादीतील बदलांबाबत निर्माण झालेली शंका यामुळे मतदार मोठ्या संख्येने मतदानासाठी बाहेर पडले. हे मतदान 'प्रतिक्रियात्मक' स्वरूपाचे असल्याचे दिसते—जणू काही आपल्या हक्काचे संरक्षण करण्यासाठी मतदारांनी मतदानाचा मार्ग निवडला आहे. अशा परिस्थितीत उच्च मतदानाचा अर्थ केवळ सत्तांतराची शक्यता नसून तीव्र राजकीय स्पर्धेचे प्रतिबिंबही असतो. याउलट, तामिळनाडूतील मतदानाचा कल अधिक स्थिर आणि पूर्वानुमान करता येण्याजोगा आहे. द्रमुक आणि अद्रमुक या दोन प्रमुख पक्षांमधील दीर्घकालीन स्पर्धा, मजबूत संघटनशक्ती आणि सातत्याने राबविल्या जाणाऱ्या कल्याणकारी योजना यामुळे येथे मतदानाची प्रक्रिया एक 'राजकीय सवय' बनली आहे. मतदार भावनिक उद्रेकाऐवजी विचारपूर्वक निर्णय घेतात, आणि त्यामुळे मतदानाचा उच्च टक्का हा स्थैर्याचे प्रतीक ठरतो. येथे उच्च मतदान म्हणजे विद्यमान सत्तेला मिळालेला विश्वास असेही अनेकदा दिसून येते.

दोन्ही राज्यांमध्ये एक महत्त्वाचा समान धागा म्हणजे महिला मतदारांचा वाढता सहभाग. महिलांनी मोठ्या प्रमाणावर मतदान केल्याने निवडणुकीच्या निकालावर त्यांचा प्रभाव अधिक ठळक होत आहे. अन्नसुरक्षा, आरोग्य सुविधा, थेट आर्थिक सहाय्य आणि कल्याणकारी योजना या मुद्द्यांवर महिलांचा कल निर्णायक ठरतो. त्यामुळे भविष्यातील राजकारणात महिलांची भूमिका केवळ मतदार म्हणून नव्हे, तर धोरणनिर्मितीवर प्रभाव टाकणारी शक्ती म्हणून अधिक बळकट होणार आहे. उच्च मतदानाचा अर्थ नेहमीच सत्तांतर असा नसतो, ही बाब या दोन्ही राज्यांच्या उदाहरणातून स्पष्ट होते. ज्या राज्यांमध्ये पक्षयंत्रणा मजबूत असते, तेथे उच्च मतदान हे सत्ताधाऱ्यांच्या संघटनक्षमतेचे द्योतक ठरते. तामिळनाडू याचे उत्तम उदाहरण आहे. परंतु बंगालमध्ये हे समीकरण अधिक गुंतागुंतीचे आहे, कारण येथे मतदानाचा उच्च टक्का हा बदलाची इच्छा, असंतोष आणि स्पर्धेची तीव्रता यांचा मिलाफ आहे.

शेवटी, लोकशाहीची खरी ताकद केवळ मतदानाच्या टक्केवारीत नसून त्या मागील जाणीवेत आहे. मतदार जागरूकपणे, स्वयंस्फूर्तीने मतदान करत असतील, तर तो लोकशाहीवरील विश्वासाचा पुरावा आहे. मात्र त्या विश्वासाचा कौल कोणाच्या बाजूने झुकतो, हे ठरवताना सामाजिक वास्तव, स्थानिक प्रश्न, नेतृत्वाची प्रतिमा आणि पक्षांची संघटनशक्ती हे सर्व घटक निर्णायक ठरतात. म्हणूनच, मतदानाची टक्केवारी हा केवळ आकडा नसून लोकशाहीच्या आरोग्याचे प्रतिबिंब आहे—आणि त्या प्रतिबिंबाचे अचूक विश्लेषण करणे हीच खरी लोकशाहीची कसोटी आहे.

## प्रासंगिक »

### मातृभाषा आणि संस्कार

**मातृभाषेतूनच शिक्षण द्या. अखेरपर्यंत टिकतील, असे अनेक विचारवंतांनी सांगितले तरी आपल्या अहंकारापायी आपण आपल्या मुलांना प्रभाषेतूनच शिक्षण देतो.**

नाना फडणवीस यांच्याकडे एक बहुभाषिक गेला. म्हणाला, "मला सोळा भाषा उत्तम येतात. माझी मातृभाषा कोणती हे आपण ओळखून दाखवाल काय?"

नाना फडणवीस म्हणाले, "अवश्य ओळखेन. पण आता दरबाराच्या कामामुळे मला अजिबात वेळ नाही. उद्या सांगतो. मी तुमचं आव्हान स्वीकारलं आहे."

रात्री नानांनी त्याला भरपूर जेवायला घातलं. तो मनुष्य गाढ झोपी गेला. मध्यरात्री नाना याच्याजवळ गेले, घडाभर पाणी घेऊन त्याच्या तोंडावर मारले.

तेव्हा तो मनुष्य कानडीत ओरडत उठला, "अहो, हे काय करता?" नाना फडणवीस त्याला म्हणाले, "आपली मातृभाषा कानडी." तो प्रवासी अचंबित झाला.

- तात्पर्य : मातृभाषा आणि तिचे संस्कार आपणाला अखेरपर्यंत सोबत करतात.

आजच्या राजकारणात आरोप, धाडी आणि त्यानंतरचे निर्दोषत्व हा एक नवा 'नॉर्मल' बनू लागला आहे. कुणावरही आरोप झाले की समाजमाध्यमांवर तात्काळ दोन गट तयार होतात.

## 'निर्दोषां'चे पीक




एक आरोपांचा निषेध करणारा, तर दुसरा त्याला राजकीय सूड म्हणून नाकारणारा. या वादळात सत्य, प्रक्रिया आणि न्याय या तिन्ही गोष्टी मागे पडतात.

अलीकडच्या काळात अनेक गाजलेल्या प्रकरणांमध्ये आरोपी निर्दोष सुटल्याची उदाहरणे दिसतात. काहींना जामीन मिळतो, काहींचे गुन्हेच रद्द होतात, तर काहींना 'क्लीनचिट' मिळते. या घटनांचा वेग इतका वाढला आहे की सामान्य माणसाच्या मनात एकच प्रश्न निर्माण होतो—मग आरोप झालेच कसे? आणि जर आरोपच ठोस नसतील, तर ते इतक्या मोठ्या आवाजात मांडले का गेले? या प्रक्रियेत तपास यंत्रणांची विश्वासार्हता आणि न्यायप्रणालीवरील विश्वास या दोन्ही गोष्टींची कसोटी लागते. यातून एक वेगळे राजकीय समीकरण तयार झाले आहे. सत्ताधाऱ्यांविरोधात आरोप उभे करायचे, त्यावर राजकीय वातावरण तापवायचे, आणि नंतर तेच नेते सत्तेच्या वर्तुळात सामील झाले की आरोपांची धार बोथट व्हायची—हा पॅटर्न वारंवार दिसू लागला आहे. त्यामुळे 'भ्रष्टाचार' हा शब्दही हळूहळू आपली तीव्रता गमावत चालला आहे. एकेकाळी ज्या आरोपांमुळे सत्तांतर घडत होते, तेच आरोप आता केवळ राजकीय खेळी म्हणून पाहिले जात आहेत. यातून गंभीर बाब म्हणजे समाजाची बदलती मानसिकता. सामान्य नागरिक या साऱ्या घडामोडींना सरावत चालला आहे. आरोप झाले की संताप व्यक्त करायचा, निर्दोषत्व मिळाले की विसरून जायचे—ही सवय बनत आहे. काहीजण या प्रक्रियेकडे पूर्णपणे संशयाने पाहतात, तर काहीजण तटस्थ राहणे पसंत करतात. परिणामी, प्रश्न विचारण्याची आणि उत्तरांची मागणी करण्याची प्रवृत्ती कमी होत चालली आहे.

या सगळ्याचा परिणाम म्हणजे सार्वजनिक जीवनातील नैतिकतेची पुनर्मांडणी. 'आत येणार की आत जाणार' या चर्चेत अनेकांनी आपली भूमिका बदललेली दिसते. राजकीय निष्ठा, तत्त्वे आणि विचारधारा यापेक्षा सत्तेच्या जवळ राहणे अधिक महत्त्वाचे ठरू लागले आहे. त्यामुळे आरोप आणि निर्दोषत्व यांच्यातील सीमारेषा धूसर होत चालली आहे. लोकशाहीची खरी ताकद केवळ निवडणुकांमध्ये नसून संस्थांच्या विश्वासार्हतेत आणि नागरिकांच्या जागरूकतेत असते. जर आरोप आणि निर्दोषत्व यांचा खेळच सतत चालू राहिला, तर त्या विश्वासाला तडा जाणे अपरिहार्य आहे. शेवटी, प्रश्न एवढाच उरतो—निर्दोषांची ही वाढती संख्या खरोखर न्यायाचे प्रतीक आहे का, की ती आपल्या सामूहिक संवेदनशीलतेच्या बोथटपणाचे लक्षण आहे?

## ।। अभंगवाणी ।।



कीर्तन चांग कीर्तन चांग ।
होय अंग हरीरूप ॥१॥

प्रेमेछंदें नाचे डोले ।
हारपले देहभाव ॥ध्रु.॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# शिक्षण विभागाच्या धोरणांमुळे अनुदानित शिक्षण संकटात

## शिक्षकांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत असल्याने तातडीने कारवाई करा

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठीसह अन्य प्रादेशिक भाषेतून शिक्षण देणाऱ्या शाळा बंद पाडण्याचे आणि तेथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना वेतनापासून वंचित ठेवण्याचे काम शिक्षण विभागाकडून करण्यात येत आहे. तसेच शाळांच्या संच मान्यतेमधील चुकांमुळे अनेक शिक्षकांचे वेतन थांबविण्यात आले आहे. त्यामुळे या शिक्षकांवर उपासमारीची वेळ आली आहे. शिक्षकांना आर्थिक व मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे याबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात येत आहे.**




राज्यातील शाळा जाणीवपूर्वक बंद करून समायोजनाच्या नावाखाली शिक्षकांचे वेतन थांबविण्यात येत आहे. त्यामुळे शिक्षकांना घरखर्च चालविणे अवघड झाले आहे. मुलांच्या शाळेचे शुल्क, घराच्या कर्जाचे हप्ते, विम्याचे हप्ते भरण्यासाठी शिक्षकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. सध्याच्या प्रशासकीय कार्यकाळात शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि शैक्षणिक संस्थांना आर्थिक व मानसिक त्रास होईल असे निर्णय घेतले जात आहेत. यामुळे कर्मचाऱ्यांवर विनावेतन जगण्याची वेळ आली आहे. शिक्षक विभागाकडून शिक्षकांची सुरू असलेली पिळवणूक थांबविण्यासाठी विधान परिषदेचे आमदार ज. मो. अभ्यंकर यांनी थेट शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग यांना पत्र पाठवून तात्काळ कार्यवाही करण्याची मागणी केली आहे. या पत्रामध्ये खासगी अनुदानित शाळांमधील अतिरिक्त शिक्षकांना अन्यत्र सामावून घेण्यापूर्वी त्यांचे वेतन बंद करणे बेकायदेशीर असून, 'महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी नियमावली १९८१' चे उल्लंघन आहे. त्याचप्रमाणे मुंबई महानगरपालिकेच्या शाळांत रिक्त जागांवर सामावून घेतलेल्या अतिरिक्त शिक्षकांच्या वेतनाची जबाबदारी राज्य शासनाने घेतलेली असतानाही, त्यांचे वेतन गोठवण्यात आले आहे. रात्रशाळेतील दुबार शिक्षकांचे वेतन तांत्रिक कारणास्तव गेल्या दोन महिन्यांपासून बंद आहे. प्रधान सचिवांनी ऑनलाइन वेतन करण्याचे आदेश देऊनही प्रत्यक्षात त्यांना अद्याप वेतन मिळालेले नाही. गेल्या दोन वर्षांपासून शिक्षकांचे वेतन वेळेवर होत नाही. वेतन उशिरा मिळाल्यामुळे गृहकर्ज किंवा इतर हप्ते भरणाऱ्या कर्मचाऱ्यांना नाहक आर्थिक दंडाचा भुर्दंड सहन करावा लागत असल्याची बाब आमदार अभ्यंकर यांनी पत्राद्वारे शिक्षण आयुक्तांच्या निदर्शनास आणून दिली.

### 'संच मान्यता' दुरुस्तीचा सावळा गोंधळ

शाळांच्या संच मान्यतेमधील चुका दुरुस्त करण्याचे प्रस्ताव शिक्षण संचालक कार्यालयात वर्षानुवर्ष प्रलंबित आहेत. संच मान्यता दुरुस्त न झालेल्या शिक्षकांचे वेतनही थांबवण्यात आले आहेत. ही अतिशय गंभीर बाब आहे. शिक्षण उपसंचालकांना हे अधिकार दिल्यास हा गोंधळ लवकर सुटेल, असेही पत्रात सुचवण्यात आले आहे. या विलंबामुळे अनेक शिक्षक आर्थिक अडचणीत सापडले असून त्यांच्या कुटुंबांवरही त्याचा विपरीत परिणाम होत आहे. प्रशासकीय प्रक्रियेतील अकार्यक्षमता आणि विलंब यामुळे शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होत आहे. संबंधित विभागाने तातडीने निर्णय घेऊन प्रलंबित प्रस्तावांना मंजुरी देणे गरजेचे आहे.

> शिक्षण विभागाच्या या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये प्रचंड असंतोष आहे. वेगवेगळी कारणे दाखवून शिक्षकांचे वेतन रोखले जात आहे. या प्रश्नांचे गांभीर्य ओळखून शासनाने तत्काळ पावले उचलली नाहीत, तर शिक्षक-शिक्षकेतर कर्मचाऱ्यांमध्ये प्रचंड संताप निर्माण होईल. त्याचा अध्यापनावर विपरीत परिणाम होईल.
>
> **- आमदार ज. मो. अभ्यंकर, सदस्य, महाराष्ट्र विधान परिषद.**

# बागेश्वर बाबाचे विधान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांना मान्य आहे का? माकपचा सवाल

**महाईन्यूज । मुंबई**

**छत्रपती शिवाजी महाराज यांचा खरा इतिहास जनतेसमोर आणणाऱ्या कॉम्रेड गोविंद पानसरे यांच्या शिवाजी कोण होता? या पुस्तकाच्या शीर्षकावरून शिवसेनेचे आमदार संजय गायकवाड यांनी या पुस्तकाचे प्रकाशक प्रशांत अंबी यांना अत्यंत वाईटरित्या शिवीगाळ केली. धमक्या दिल्या आहेत. माता भगिनीवरून त्यांनी वापरलेली भाषा कोणत्याही माणसाला सहन होणार नाही.**





आमदार संजय गायकवाड यांचा व त्यांच्या पक्षाचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारला पाठिंबा आहे. आपल्या सरकारला पाठिंबा देणाऱ्या संजय गायकवाड यांच्या वक्तव्याबाबत मुख्यमंत्र्यांनी आपली भूमिका स्पष्ट करण्याची आवश्यकता आहे, अशी मागणी भारताचा कम्युनिस्ट पक्षाचे (मार्क्सवादी) राज्य सचिव डॉ अजित नवले यांनी केली आहे.

एकीकडे नारी वंदनाची बात करायची व दुसरीकडे महिलांना अशा प्रकारे भाषा वापरणाऱ्यांचा पाठिंबा घेत त्यांच्या कृतीचे, मौन बाळगत समर्थन करायचे हा दुटप्पीपणा सोडण्याची गरज आहे, असेही नवले यांनी म्हटले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या उपस्थितीमध्ये कथा वाचक बागेश्वर बाबा यांनी छत्रपती शिवाजी महाराजांबद्दल अत्यंत वादग्रस्त विधान केले आहे. छत्रपती शिवाजी महाराज हे थकले होते व त्यांनी आपला राजमुकुट आणि राजसत्ता रामदास स्वामी यांच्यासमोर ठेवली होती, असे इतिहासाच्या तथ्यांची तोडमोड करून छत्रपतींबद्दल वादग्रस्त विधान केले आहे.

याशिवाय, राज्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत असून या प्रकरणामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. सामाजिक समतोल राखण्यासाठी जबाबदार नेत्यांनी संयमित भूमिका घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे. महिलांच्या सन्मानाचा प्रश्न हा केवळ राजकीय नसून सामाजिक मूल्यांशी निगडित असल्याचेही नवले यांनी अधोरेखित केले. अशा प्रकारच्या वक्तव्यांमुळे समाजात चुकीचा संदेश जात असल्याची चिंता त्यांनी व्यक्त केली.

याशिवाय, राज्यातील राजकीय वातावरण दिवसेंदिवस तापत असून या प्रकरणामुळे नव्या वादाला तोंड फुटले आहे. सामाजिक समतोल राखण्यासाठी जबाबदार नेत्यांनी संयमित भूमिका घेणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

### मुख्यमंत्री फडणवीस व मोहन भागवत समर्थन करतात का?

बागेश्वर बाबा यांच्या या विधानाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व मोहन भागवत समर्थन करत आहेत काय ? असा प्रश्न मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने उपस्थित केला आहे. या बाबतही त्यांनी भूमिका स्पष्ट करावी, असे आवाहन माकपने केले आहे. फडणवीस यांनी आमदार संजय गायकवाड व कथावाचक बागेश्वर बाबा या दोघांवरही कडक कारवाई करावी, अशी मागणीही मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने माकपने केली आहे.

# 'होर्मुझ' बंद होताच 'या' देशाला लागली लॉटरी!

## अनेक देश चिंताग्रस्त असताना पश्चिम आशियातील पनामा या चिमुकल्या राष्ट्राला मोठा फायदा

**महाईन्यूज । पनामा**

**अमेरिका, इस्त्रायलने इराणवर २८ फेब्रुवारी रोजी हल्ला केला. हा संघर्ष चिघळला. तेव्हापासून भारतासह जगातील अनेक देश तेल संकटाचा सामना करत आहेत. तेल पुरवठ्यावरुन अनेक देश चिंताग्रस्त असताना पश्चिम आशियातील पनामा या चिमुकल्या राष्ट्राला मोठा फायदा झाला आहे. पश्चिम आशियातील युद्ध आणि होर्मुजच्या सामुद्रधुनीतील (STRAIT OF HORMUZ) नाकेबंदीमुळे जागतिक व्यापाराची समीकरणे बदलली आहेत. पनामा सरकार या जागतिक संकटाचा फायदा घेत प्रचंड कमाई करत आहे.**



### 'होर्मुझ' असुरक्षित, 'पनामा' सुरक्षित

जगातील एकूण तेल वापरापैकी सुमारे २० टक्के हिस्सा होर्मुजच्या सामुद्रधुनीतून होतो. पनामा कालवा आणि होर्मुज सामुद्रधुनी या दोन्ही जगातील अत्यंत महत्त्वाच्या सागरी व्यापारी मार्गांपैकी एक आहेत.दीड महिन्यापेक्षा अधिक काळ इराण आणि अमेरिका यांच्यातील लष्करी संघर्षामुळे हा मार्ग पूर्णपणे असुरक्षित झाला आहे. अशा परिस्थितीत, अमेरिकेच्या मेक्सिको आखातातून आशियाकडे जाणारा शिपिंग कंपन्यांकडे पनामा कालवा हाच सर्वात सुरक्षित आणि प्रमुख पर्यायी मार्ग उरला आहे. अनेक मालवाहू जहाजे सुरक्षिततेसाठी अटलांटिक आणि पॅसिफिक महासागरातील मार्गांचा वापर करतात, ज्याचा केंद्रबिंदू पनामा कालवा आहे.तेल आणि वायू वाहून नेणारी जहाजे आता मोठ्या संख्येने पनामा कालव्याकडे वळत आहेत, ज्यामुळे तेथील ट्रॅफिकने विक्रमी पातळी गाठली आहे.

पनामा कालवा प्राधिकरणाने दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावरून लवकरात लवकर पुढे जाण्यासाठी शिपिंग कंपन्यांनी ४० लाख डॉलर (सुमारे ३७ कोटी रुपये) पर्यंतची अतिरिक्त बोली लावली आहे.

पनामा कालव्यातून जाण्यासाठी सामान्यतः एक निश्चित दर असतो, परंतु ज्या जहाज राखीव केले जात नाही. त्यांच्यासाठी प्राधिकरण लीलाव आयोजित करते. यात जो सर्वात मोठी बोली लावतो, त्याला प्राधान्याने मार्ग दिला जातो. होर्मुजमधील नाकेबंदीमुळे पनामा कालव्यावर जहाजांची संख्या इतकी वाढली आहे की, आता तेथे लांबच लांब वेटिंग लिस्ट तयार झाली आहे.

एका जहाजाला पार करण्यासाठी सरासरी खर्च ३ ते ४ लाख डॉलर दरम्यान असतो. पूर्वी कंपन्या लवकर निघण्यासाठी २.५ ते ३ लाख डॉलर अतिरिक्त द्यायच्या; परंतु गेल्या काही आठवड्यांत ही सरासरी अतिरिक्त किंमत ४.२५ लाख डॉलरवर पोहोचली आहे. पनामा कालव्याचे प्रशासक रिकाउर्ते वास्क्वेज यांनी खुलासा केला की, एका इंधन वाहू जहाजाने आपले मुक्कामाचे स्थान बदलण्यासाठी आणि लवकर पोहोचण्यासाठी ४० लाख डॉलरची अतिरिक्त बोली लावली. हे जहाज युरोपला जात होते, परंतु इंधनाच्या कमतरतेमुळे ते सिंगापूरच्या दिशेने वळवण्यात आले.

इराण आणि अमेरिका यांच्यातील तणावामुळे होर्मुजचा मार्ग आता अत्यंत धोकादायक झाला आहे. क्षेपणास्त्र आणि ड्रोन हल्ल्यांच्या भीतीने कंपन्या पनामा कालव्याला सुरक्षित पर्याय मानत आहेत. पनामाचे प्रसिद्ध विश्लेषक रोड्रिगो नोरिएगा यांच्या मते, पनामा सरकार या जागतिक संकटातून होणारी कमाई वाढवण्याचा प्रयत्न करत आहे. मात्र, यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर मोठा दबाव येत आहे.

पनामा कालव्याचा प्रवास महागल्यामुळे जागतिक पुरवठा साखळीवर थेट परिणाम होत आहे. याचा परिणाम म्हणून येणाऱ्या काळात तेल, वायू आणि इतर जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीत मोठी वाढ होण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. पनामा कालव्यावरील वाढत्या गर्दीमुळे जागतिक व्यापार व्यवस्थेवर मोठा ताण निर्माण झाला आहे. यामुळे शिपिंग कंपन्यांचे ऑपरेशनल खर्च वाढत असून त्याचा थेट परिणाम ग्राहकांवर होणार आहे. विशेषतः ऊर्जा क्षेत्रात अनिश्चितता वाढल्याने अनेक देश पर्यायी मार्गांचा शोध घेत आहेत.

# "घाबरुन नाही, तर हताश होऊन पक्ष सोडला"; राघव चड्ढा

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**भाजपा आणि आप यांच्यात 'शीशमहल २' वरून आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. या वादात आता राघव चड्ढा यांनीही उडी घेतली असून आपवर निशाणा साधला आहे. ७ खासदारांसह पक्ष सोडल्यानंतर राघव चड्ढा म्हणाले की, 'आप'चा दिल्ली निवडणुकीत पराभव होण्यामागे 'शीशमहल' हे एक मोठं कारण होतं. आता एक वर्ष उलटत नाही तोच पक्ष 'शीशमहल २' वादात अडकला आहे.**



### 'घाबरुन नाही, तर हताश होऊन पक्ष सोडला'

इतर ६ खासदारांसह 'आप' सोडून भाजपामध्ये प्रवेश केल्यावर राघव चड्ढा म्हणाले की, "जो व्यक्ती 'आप'शी जोडलेला होता, तो एकतर पक्ष सोडून गेला आहे किंवा सोडत आहे. आम्ही ७ खासदारांनी मिळून पक्ष सोडला आहे. 'आप'चे नेते म्हणत आहेत की आम्ही घाबरलो आहोत, परंतु आम्ही घाबरुन नाही, तर हताश होऊन पक्ष सोडला आहे."

राघव चड्ढा म्हणाले की, दिल्लीत तयार झालेल्या 'शीशमहल पार्ट २' चे काही फोटो समोर आले आहेत. जेव्हा पहिला 'शीशमहल' बांधला गेला होता, तेव्हाच आम आदमी पक्षाची प्रतिमा मलिन झाली होती. माझ्या मते, दिल्ली निवडणुकीत पराभवाचे सर्वात मोठं कारण कोणतं असेल, तर त्यात या 'शीशमहल'चा समावेश होता. आम आदमी पक्षाला दिल्ली निवडणूक हरून अद्याप एक वर्षही पूर्ण झालेलं नाही आणि आता 'शीशमहल पार्ट २' प्रकरण समोर आलं आहे.

राघव चड्ढा पुढे म्हणाले की, समोर आलेले फोटो पाहिल्यास स्पष्ट होतं की, हे निवासस्थान अत्यंत आलिशान बनवण्यात आलं आहे. 'आप'ने या सर्व मुद्द्यांवर आत्मचिंतन करण्याची गरज आहे. पक्षात जे काही मोजके चांगले कार्यकर्ते उरले आहेत, ते या सर्वांना कसं उत्तर देणार? गल्ली-परिसरात जेव्हा लोक 'शीशमहल'बद्दल प्रश्न विचारतील, तेव्हा ते काय सांगणार? 'आप'ने या विषयांवर गांभीर्याने विचार केला पाहिजे.

प्रवेश वर्मा यांनी पत्रकार परिषद घेऊन दावा केला होता की, केजरीवाल यांचा नवा बंगला अत्यंत भव्य आणि आलिशान आहे. काही फोटो प्रसिद्ध करून त्यांनी या बंगल्याचा उल्लेख 'शीशमहल-२' असा केला होता. "केजरीवाल यांनी सांगावं की या नव्या बंगल्यावर किती पैसा खर्च केला आहे आणि हा पैसा कोणाचा आहे?" असंही म्हटलं आहे. राघव चड्ढा यांनी या प्रकरणावरून पारदर्शकतेचा मुद्दा उपस्थित करत सरकारकडून स्पष्ट उत्तरांची मागणी केली आहे. विरोधकांकडूनही या विषयावर तीव्र टीका होत असून, जनतेमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. दिल्लीतील नागरिकांना त्यांच्या कराच्या पैशांचा वापर नेमका कुठे आणि कसा होतो, याबाबत अधिक माहिती हवी आहे. या पार्श्वभूमीवर आगामी काळात हा मुद्दा राजकीयदृष्ट्या अधिक तापण्याची शक्यता आहे.

# नायक नहीं, खलनायक हूं मैं




तब्बल ३३ वर्षांपूर्वी आलेल्या 'खलनायक' या कल्ट क्लासिक चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर धुमाकूळ घातला होता. या चित्रपटातील अभिनेता संजय दत्तच्या अभिनयाने चाहत्यांना वेड लावले आणि त्याला 'खलनायक' ही कायमची ओळख मिळाली. आता तोच 'बल्लू' ३३ वर्षांनंतर पुन्हा एकदा जेलमधून फरार होऊन दहशत पसरवण्यासाठी परतला आहे. नुकताच 'खलनायक रिटर्न्स'चा फर्स्ट लूक टीझर समोर आला असून, यामध्ये संजय दत्त अत्यंत क्रूर आणि थरारक लूकमध्ये पाहायला मिळत आहे. संजय दत्तने सोशल मीडियावर 'खलनायक रिटर्न्स'चे दोन पोस्टर्स शेअर केले आहेत. पहिल्या पोस्टरमध्ये संजय दत्त एकटक पाहत सिगार पेटवताना दिसत आहे आणि त्याच्या हातात आग लागलेली आहे. दुसऱ्या पोस्टरमधील त्याचे भयानक हास्य खरोखरच अंगावर काटा आणणारे आहे. फोटो शेअर करून संजय दत्तने हटके कॅप्शनमध्ये लिहिले, "प्रत्येक कथेची एक वेळ असते आणि तिची वेळ आली आहे...खलनायक रिटर्न्स." टीझरसोबतच संजय दत्तने चित्रपटाचे दोन पोस्टर्सही शेअर केले आहेत. एका पोस्टरमध्ये तो सिगार पेटवताना दिसत आहे, तर दुसऱ्या पोस्टरमधील त्याचे भीषण हास्य अंगावर शहारे आणणारे आहे. पोस्टर्स शेअर करताना संजयने लिहिले की, "प्रत्येक कथेची एक वेळ असते आणि आता त्याची वेळ आली आहे. खलनायक रिटर्न्स." जिओ स्टुडिओजने आपल्या अधिकृत यूट्यूब चॅनेलवर 'खलनायक रिटर्न्स'चा छोटा टीझर प्रदर्शित केला आहे. टीझरमध्ये एक माणूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेला दिसत असून, त्यानंतर हातात बेड्या असलेल्या संजय दत्तची दमदार एंट्री होते. आपली सिगार पेटवत तो घोगऱ्या आवाजात म्हणतो, "बोला था ना... १० ऑक्टोबर, रात के १० बजे बल्लू जेल से फुर्र... नायक नहीं, खलनायक हूं मैं।" १ मिनिट १२ सेकंदांचा हा टीझर पाहून चाहते कमालीचे उत्साही झाले आहेत. 'धुरंधर २' नंतर जिओ स्टुडिओजचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसचे सर्व रेकॉर्ड मोडेल, अशी चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. मात्र 'खलनायक रिटर्न्स' ची अद्याप रिलीज डेट अधिकृतपणे जाहीर झाली नाही. १९९३ मध्ये सुभाष घई यांच्या दिग्दर्शनाखाली मूळ 'खलनायक' प्रदर्शित झाला होता, ज्यामध्ये संजय दत्तसोबत माधुरी दीक्षित आणि जॅकी श्रॉफ मुख्य भूमिकेत होते. 'खलनायक रिटर्न्स'मध्ये संजू बाबाच्या विरोधात कोणती अभिनेत्री असणार, हे मात्र अजूनही गुलदस्त्यात आहे. या टीझरनंतर चित्रपटाच्या कथानकाबद्दलही प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. 'बल्लू'चा हा नवीन अवतार पूर्वीपेक्षा अधिक धोकादायक आणि अनपेक्षित वळणांनी भरलेला असेल, अशी चर्चा सुरू आहे. चित्रपटात जबरदस्त ॲक्शन, दमदार डायलॉग्स आणि सस्पेन्सचा तडका पाहायला मिळणार असल्याची चाहत्यांना खात्री वाटते. आता या चित्रपटाचा ट्रेलर आणि रिलीज डेट कधी जाहीर होणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



बॉलिवूडमध्ये सध्या 'कॉकटेल 2' या चित्रपटाची जोरदार चर्चा सुरू आहे. दीपिका पादुकोण पुन्हा एकदा 'वेरोनिका' या तिच्या लोकप्रिय भूमिकेत दिसणार का, याबद्दल चाहत्यांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे. मात्र या चर्चांमागची खरी परिस्थिती थोडी वेगळी आहे. २०१२ मध्ये आलेल्या कॉकटेल या चित्रपटात दीपिकाने 'वेरोनिका' ही बिनधास्त, आत्मविश्वासी आणि भावनिक मुलगी साकारली होती. तिची ही भूमिका प्रेक्षकांच्या मनात आजही कायम आहे. त्या चित्रपटात सैफ अली खान आणि डायना पेंटी यांच्यासोबतचा लव्ह ट्रायंगल विशेष गाजला होता. आता या चित्रपटाचा सिक्वेल 'कॉकटेल 2' जाहीर झाल्यानंतर पुन्हा एकदा वेरोनिकाच्या पुनरागमनाच्या चर्चा रंगल्या आहेत. सोशल मीडियावर, विशेषतः रेडिटवरील एका पोस्टमुळे या अफवांना सुरुवात झाली. त्या पोस्टमध्ये असा दावा करण्यात आला की दीपिका काही महिन्यांपूर्वी मॅडॉक फिल्म्सच्या ऑफिसमध्ये गेली होती आणि तिला 'कॉकटेल 2'मध्ये कॅमिओसाठी संपर्क करण्यात आला होता. इतकंच नाही, तर तिने शूटिंगही पूर्ण केल्याचा दावा त्या पोस्टमध्ये करण्यात आला.

## 'कॉकटेल 2'मध्ये 'वेरोनिका' परतणार?

## 'आशिकी 2' पुन्हा थिएटरमध्ये?

बॉलिवूडमध्ये सध्या जुन्या चित्रपटांच्या री-रिलीजचा ट्रेंड वाढताना दिसत आहे. अशातच आता २०१३ मधील सुपरहिट चित्रपट आशिकी 2 पुन्हा थिएटरमध्ये येणार का, याबद्दल चर्चा रंगल्या आहेत. याला कारण ठरल आहे अभिनेत्री श्रद्धा कपूर हिचा एक जुना व्हिडिओ, जो सध्या सोशल मीडियावर पुन्हा व्हायरल झाला आहे. या चित्रपटात आदित्य रॉय कपूर आणि श्रद्धा कपूर यांची जोडी प्रेक्षकांना खूप आवडली होती. चित्रपटातील प्रेमकथा, भावनिक गाणी आणि दमदार अभिनयामुळे 'आशिकी 2' बॉक्स ऑफिसवर हिट ठरला होता. आजही या चित्रपटाची लोकप्रियता कमी झालेली नाही. सध्या व्हायरल होत असलेला हा व्हिडिओ श्रद्धा कपूरच्या एका जुन्या 'आस्क मी एनीथिंग' सत्रातील आहे. या सत्रात एका चाहत्याने 'आशिकी 2' पुन्हा थिएटरमध्ये रिलीज करण्याबद्दल प्रश्न विचारला होता. त्यावर श्रद्धाने खूप उत्साहाने प्रतिक्रिया दिली होती. ती म्हणाली होती, "मला वाटतं ही खूप छान आयडिया आहे. मी नक्कीच हा सल्ला प्रोड्यूसर्सना देईन, कारण मलाही हा चित्रपट पुन्हा मोठ्या पडद्यावर पाहायला आवडेल." तिच्या या उत्तरामुळे चाहत्यांमध्ये पुन्हा एकदा उत्सुकता वाढली आहे.



# केएल राहुलचा ऐतिहासिक विक्रम!

## IPL इतिहासात १५०+ धावा करणारा पहिला भारतीय

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**दिल्लीच्या अरूण जेटली स्टेडियममध्ये केएल राहुलचं वादळ पाहायला मिळालं. सलामीला उतरलेल्या राहुलने २२६ च्या स्ट्राईक रेटने वादळी फटकेबाजी करत धावांचा पाऊस पाडत मोठ्या विक्रमाला गवसणी घातली आहे. राहुलला दोन वेळा जीवदान दिल्याचा पंजाब किंग्सला चांगलाच फटका बसला आहे. याचा फायदा घेत राहुलने तब्बल १५२ धावांची वादळी खेळी साकारली. यासह अनोखा विक्रम करणारा राहुल पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे.**



केएल राहुलची खेळी खूपच प्रभावी होती. तो वादळी फॉर्मात दिसत होता आणि त्याला दोनदा जीवदानही मिळालं. जेव्हा राहुल फक्त १२ धावांवर खेळत होता, तेव्हा शशांक सिंगने एक सोपा झेल सोडला. या संधीचा फायदा घेत राहुलने अवघ्या २६ चेंडूंमध्ये आपलं अर्धशतक पूर्ण केलं. त्यानंतर, जेव्हा तो ५१ धावांवर खेळत होता, तेव्हा आणखी एक झेल सुटला. या दुसऱ्या जीवदानानंतर, राहुलने पूर्ण आक्रमक पवित्रा घेतला आणि अवघ्या ४७ चेंडूंमध्ये १०० धावांचा टप्पा गाठला.

राहुलने अवघ्या ४७ चेंडूंमध्ये शतक पूर्ण करून पंजाबच्या गोलंदाजांना हैराण केलं. त्याच्या आयपीएल कारकिर्दीतील हे सहावं शतक आहे. दिल्ली कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला आणि राहुलने संघाला एक दमदार सुरुवात करून दिली आणि २६४ धावांची विक्रमी धावसंख्या उभारण्यात मोठं योगदान देत नाबाद माघारी परतला.

केएल राहुलने ४७ चेंडूत शतक पूर्ण केल्यानंतर त्याने या सामन्यात १५२ धावांची उत्कृष्ट खेळी साकारली. राहुलने २२६.८७ च्या स्ट्राईक रेटने ६७ चेंडूत १६ चौकार व ९ षटकारांसह १५२ धावांची खेळी केली. आयपीएल इतिहासात १५० हून अधिक धावा करत सर्वात मोठी खेळी साकारणारा राहुल हा पहिला भारतीय फलंदाज ठरला आहे. आजवर कोणत्याच भारतीय खेळाडूने आयपीएलमध्ये १५० हून अधिक धावा केलेल्या नाहीत.




# आशियाई क्रीडा स्पर्धेच्या आयोजनातही भारताचे स्वारस्य

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**भारताने २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धांच्या यजमानपदापाठोपाठ २०३८ च्या आशियाई क्रीडा स्पर्धेचे यजमानपद मिळविण्यासाठी स्वारस्य दाखवले आहे. यासाठी पहिले पाऊल टाकताना अधिकृतपणे 'स्वारस्य पत्र' देखील सादर केले आहे. भारतीय ऑलिम्पिक संघटनेच्या (आयओए) एका वरिष्ठ अधिकाऱ्याने ही माहिती दिली असून, हे भारताला जागतिक क्रीडा स्पर्धांचे केंद्र बनवण्याच्या धोरणातील हे एक महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.**



'आयओए'ने अलिकडेच २०३८ च्या खेळांच्या यजमानपदासाठीचे आपले स्वारस्य पत्र आशियाई ऑलिम्पिक परिषदकडे (ओसीए) सोपवले आहे. चीनमधील सान्या शहरात २१ एप्रिल रोजी झालेल्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीत या प्रस्तावावर चर्चा करण्यात आली. सध्या येथे आशियाई बीच क्रीडा स्पर्धा सुरू आहेत. भारताने स्वारस्य पत्र सादर केल्याची आणि त्यावर चर्चा झाल्याच्या वृत्ताला 'आयओए'चे मुख्य कार्यकारी अधिकारी रघुराम अय्यर यांनी दुजोरा दिला आहे. या पुढील तपशील 'ओसीए'च्या वतीने आपल्याला कळवला जाईल, असेही अय्यर म्हणाले.

या स्पर्धेच्या यजमानपदासाठी दक्षिण कोरियाने २०२१ मध्येच आपली इच्छा व्यक्त केली असून, ग्वांगझो आणि दाएगू या शहरांची नावे त्यासाठी प्रस्तावित केली आहे. याशिवाय मंगोलिया देशानेही आपले स्वारस्य यापूर्वीच दाखवले आहे. अर्थात, या दोन्ही देशांनी अद्याप 'ओसीए'कडे अधिकृतपणे स्वारस्य पत्र सादर केल्याची माहिती नाही. त्यामुळे सध्या तरी भारत या एकमेव देशाचेच स्वारस्य पत्र आल्याचे सांगितले जात आहे. या स्पर्धेच्या यजमानपदाचा निर्णय आगामी दोन वर्षांत घेतला जाईल, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

भारताने यापूर्वी १९५१ आणि १९८२ मध्ये नवी दिल्लीत आशियाई क्रीडा स्पर्धेचे आयोजन केले होते. आशियाई क्रीडा स्पर्धेत सहभागी होणाऱ्या देशांची संख्या ऑलिम्पिकच्या तुलनेत कमी असली, तरीही सहभागी खेळाडूंची संख्या आणि समाविष्ट क्रीडा प्रकारांची संख्या या निकषांवर आशियाई क्रीडा स्पर्धा ही ऑलिम्पिकपेक्षाही मोठी ठरते. चीनमध्ये हांगझो येथे २०२३ मध्ये पार पडलेल्या अखेरच्या आशियाई क्रीडा स्पर्धेत, ४० विविध क्रीडा प्रकारांमध्ये ११ हजारहून अधिक खेळाडू सहभागी झाले होते. आगामी स्पर्धा या वर्षी जपानमध्ये आयची-नागोया शहरात होणार आहे. त्यानंतर २०३० मधील स्पर्धा सौदी अरेबियात रियाध आणि २०३४ मधील स्पर्धा कतारमध्ये दोहा येथे होणार आहेत.

### पुन्हा एकदा अहमदाबादलाच पसंती ?

भारतात २०३० मध्ये होणाऱ्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धा गुजरातच्या अहमदाबादमध्ये होणार आहेत. भारताने २०३६च्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी सादर केलेल्या प्रस्तावात देखील यजमान म्हणून अहमदाबाद शहराचेच नाव दिले आहे. त्यामुळे सहाजिकच २०३८च्या आशियाई क्रीडा स्पर्धा देखील अहमदाबाद मध्येच घेतल्या जातील असे सध्या मानले जात आहे.

स्मार्ट PCMC SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। रविवार ।
दि. 26 एप्रिल 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# चिखली STPची बारणे यांच्याकडून पाहणी

**महाईन्यूज ।**
**पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवडचे वाढते शहरीकरण आणि भविष्यातील सांडपाणी व्यवस्थापनाची गरज ओळखून पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांनी चिखली येथील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पाला (STP) भेट देऊन तेथील कामकाजाचा सविस्तर आढावा घेतला.**

चिखली परिसरातील सांडपाणी व्यवस्थापन अधिक सक्षम आणि पर्यावरणपूरक बनवण्यासाठी प्रशासनाकडून केल्या जाणाऱ्या उपाययोजनांची त्यांनी प्रत्यक्ष पाहणी केली.

या दौऱ्यादरम्यान सभापती अभिषेक बारणे यांनी प्रकल्पाच्या संपूर्ण कार्यप्रणालीची सविस्तर माहिती घेतली. सांडपाण्याचे शुद्धीकरण कोणत्या स्तरावर केले जाते आणि प्रक्रिया केलेल्या पाण्याचा प्रभावी पुनर्वापर कसा करता येईल, यावर त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांशी सखोल चर्चा केली. शहरातील जलप्रदूषण रोखण्यासाठी आणि पर्यावरण संवर्धनासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध तांत्रिक उपाययोजनांचा आढावा घेताना त्यांनी व्यवस्थापकांना सूचनाही केल्या. पर्यावरणाचे रक्षण करण्यासोबतच उपलब्ध पाण्याचा पुनर्वापर करून नैसर्गिक स्त्रोतांवरील ताण कमी करणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी यावेळी नमूद केले.


> भविष्यातील गरजा लक्षात घेऊन चिखली येथील प्रकल्पात अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा समावेश करण्यावर आणि पूर्ण क्षमतेने हा प्रकल्प राबविण्यावर विशेष भर दिला जाणार आहे.
>
> **- अभिषेक बारणे, स्थायी समिती सभापती, पिंपरी चिंचवड महापालिका.**

नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून त्यांना स्वच्छ, सुरक्षित आणि आरोग्यदायी वातावरण उपलब्ध करून देणे ही प्रशासनाची प्राथमिकता असल्याचे अभिषेक बारणे यांनी स्पष्ट केले. शहराचा होणारा विस्तार पाहता आगामी काळात सांडपाणी व्यवस्थापनाची यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.



D Y PATIL INTERNATIONAL UNIVERSITY
AKURDI PUNE
Think | Thrive | Transform

ADMISSION OPEN
A.Y. 2026



*DYPIU is a trendsetting international university focused on preparing students for the future by offering innovative curriculum and unique features that foster creativity, entrepreneurship, & leadership.*
*It empowers students to be job creators rather than job seekers in the rapidly evolving technology landscape.*

**UG/PG Programs**
- B.Tech. – Bioengineering
- B.Tech. – Chemical Engineering
- B.Tech. – Civil Engineering
- B.Tech. – Mechanical Engineering
- B.Tech. – Semiconductor Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering
- B.Tech. – Computer Science and Engineering in Artificial Intelligence & Machine Learning in association with IBM
- B.Tech. – Computer Science and Engineering in Cyber Security and Forensic in association with IBM
- B.Sc. (Hons.) – Economics
- B.Sc. (Hons.) – Forensic Sciences
- BCA (Hons.)
- BBA (Hons.)
- BA (Hons.) – Journalism & Mass Communication
- BA (Hons.) – Liberal Arts
- BFA
- B.Design
- M.Sc. – Medical Biotechnology
- M.Sc. – Medicinal Chemistry
- M.Sc.– Computational Mathematics
- M.Tech. – Computer Science and Engineering in Quantum Computing.
- MCA
- MA – Journalism & Mass Communication
- MBA – Digital Business
- MBA – Executive
- Ph.D.

Follow us on
WhatsApp

2025 Excellence in Chemical Engineering for a Sustainable Future
2025 Bright Blue Print in Civil Engineering Education
2025 Creative Excellence in Film Studies & Media Research
2024 Excellence in Digital Disruption
2024 Most Promising Engineering University in India
2024 Game Changer in Bioengineering Education
2024 Trailblazer in Semiconductor Engineering

CONTACT
Phone Number: 8600091180
Website: dypiu.ac.in
Email: admission@dypiu.ac.in
APPLY NOW
D. Y. Patil International University, J Block, Sector 29, Akurdi, Pune 411044

# खेळामुळे नेतृत्वगुण विकसित होण्यास मदत; महापौर

## निगडीत आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल स्पर्धेला उत्साहात सुरुवात

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**शालेय जीवनात विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच खेळाला सुद्धा महत्त्व देणे गरजेचे आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी क्रीडेला तितकेच महत्त्व आहे. खेळामुळे नेतृत्वगुण, निर्णयक्षमता आणि आत्मविश्वास विकसित होतो. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने नियमितपणे विविध क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी व्हावे. खेळात खिलाडूवृत्तीचे असणे अत्यावश्यक आहे, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.**



निगडी येथील ज्ञानप्रबोधिनी नवनगर विद्यालयात ग्रामीण खेळाडू विकास प्रकल्प व आमदार उमा खापरे यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या आमदार चषक जिल्हास्तरीय व्हॉलीबॉल चॅम्पियनशिप स्पर्धा २०२६ चे उद्घाटन महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी ते बोलत होते.

याप्रसंगी विधानपरिषद सदस्या आमदार उमा खापरे यांच्यासह उपमहापौर शर्मिला बाबर, महापालिकेच्या कला, क्रीडा, साहित्य व सांस्कृतिक समितीचे सभापती कैलास कुटे, नगरसदस्य अमित गावडे, ज्ञानप्रबोधिनी निगडी केंद्राचे केंद्रप्रमुख डॉ. मनोज देवळेकर, जयदीप खापरे यांच्यासह शाळेतील शिक्षक, विद्यार्थी, क्रीडाप्रेमी, खेळाडू उपस्थित होते.

महापौर रवि लांडगे म्हणाले, विद्यार्थ्यांनी शैक्षणिक प्रगतीसोबत शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना आणि शिस्त यासाठी खेळात सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे. क्रीडा स्पर्धांमधून ग्रामीण भागातील गुणवंत खेळाडूंना मोठे व्यासपीठ मिळते. अशा स्पर्धांमधूनच भविष्यात राज्य व राष्ट्रीय स्तरावरील खेळाडू घडत असतात, असे देखील यावेळी महापौर रवि लांडगे म्हणाले.

या उद्घाटन कार्यक्रमाच्या वेळी खेळाडू व प्रेक्षकांमध्ये मोठा उत्साह पाहण्यात मिळाला. या स्पर्धेमुळे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील होतकरू खेळाडूंना आपली क्षमता दाखविण्याची संधी उपलब्ध झाली असून युवकांमध्ये क्रीडाविषयी आकर्षण वाढणार आहे, अशा भावना यावेळी खेळाडूंनी व्यक्त केल्या.



## ताथवड्यात डिलिव्हरी बॉयकडून गावठी पिस्तूल जप्त

**महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड**

ताथवडे परिसरात बेकायदा गावठी पिस्तूल व जिवंत काडतूस बाळगणाऱ्या तरुणाला वाकड पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. याप्रकरणी शस्त्र अधिनियम तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २४ एप्रिल रोजी दुपारी जे.एस.पी.एम. कॉलेजच्या पाठीमागील मोकळ्या मैदानात आरोपी महेश गंगाधर साळवे (वय २६) याच्याकडे एक गावठी पिस्तूल व एक जिवंत काडतूस आढळून आले. जप्त करण्यात आलेल्या पिस्तुलावर कोणतेही ओळखचिन्ह अथवा क्रमांक नव्हता.

शहरात लागू असलेल्या प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन करून आरोपीने शस्त्र बाळगल्याचे तपासात निष्पन्न झाले. आरोपी हा ॲमेझॉन डिलिव्हरी बॉय म्हणून काम करत असल्याची माहिती पोलिसांनी दिली. पुढील तपास वाकड पोलीस करीत आहेत.

## शहराच्या पाणी प्रश्नावर आमदार अमित गोरखे यांचे आयुक्तांना निवेदन

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड शहराला भेडसावणारी पाण्याची तीव्र टंचाई दूर करण्यासाठी आणि भविष्यातील पाणीसाठा सुरक्षित करण्यासाठी आमदार अमित गोरखे यांनी पाऊल उचलले आहे. भामा आसखेड धरणातील साचलेला गाळ काढून धरणाची मूळ साठवण क्षमता वाढवण्यात यावी, यासाठी आमदार गोरखे यांनी पिंपरी चिंचवड महानगरपालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांना निवेदन दिले होते. त्यांच्या मागणीची दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने जिल्हा जलसंधारण विभागाला तातडीने कार्यवाही करण्याचे पत्र पाठवले आहे.**



पिंपरी-चिंचवड शहराच्या वाढत्या लोकसंख्येसाठी आणि औद्योगिकीकरणासाठी भामा आसखेड धरण हा एक अत्यंत महत्त्वाचा जलस्रोत आहे. या धरणातून शहराला दररोज सुमारे १६७ एमएलडी पाणीपुरवठा करण्याचा शासनाचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. मात्र, गेल्या अनेक वर्षांपासून धरणात मोठ्या प्रमाणावर गाळ साचल्याने धरणाची उपयुक्त पाणी साठवण क्षमता लक्षणीयरीत्या घटली आहे. परिणामी, पावसाळ्यात धरण भरूनही प्रत्यक्ष पाणीसाठा कमी होत असल्याने शहराला पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे.

शहरातील नागरिकांना अपुऱ्या पाणीपुरवठ्यामुळे होणारा त्रास लक्षात घेऊन आमदार अमित गोरखे यांनी २० एप्रिल २०२६ रोजी पिंपरी-चिंचवड महानगरपालिका आयुक्तांना लेखी निवेदन दिले होते. शहराची वाढती औद्योगिक गरज आणि लोकसंख्या पाहता भामा आसखेड धरणातील गाळ काढणे ही काळाची गरज आहे. जर ही कार्यवाही तातडीने झाली नाही, तर भविष्यात पाणी संकट अधिक गंभीर होईल, असा इशारा आमदार अमित गोरखे यांनी दिला आहे.

### महानगरपालिकेची सकारात्मक भूमिका:

आमदार गोरखे यांच्या निवेदनाची तातडीने दखल घेत पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त (३) यांनी २२ एप्रिल २०२६ रोजी जिल्हा जलसंधारण अधिकारी (मृद व जलसंधारण विभाग, पुणे) यांना पत्र पाठवले आहे. या पत्रात त्यांनी स्पष्ट केले आहे की, आगामी पावसाळ्यात पावसाचे प्रमाण कमी राहण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. अशा परिस्थितीत पावसाळ्या पाण्याचा जास्तीत जास्त साठा करणे अनिवार्य आहे. त्यामुळे 'गाळमुक्त धरण व गाळयुक्त शिवार' या योजनेच्या धर्तीवर भामा आसखेडमधील गाळ महिनाभरात काढण्यासाठी तातडीने सर्वेक्षण करून यंत्रणा कार्यान्वित करावी.

पिंपरी-चिंचवडकरांना पुरेसे आणि स्वच्छ पाणी मिळणे हा त्यांचा हक्क आहे. भामा आसखेड धरणातील गाळ काढल्यास धरणाची क्षमता वाढेल आणि पर्यायाने शहराचा पाणीपुरवठा सुरळीत होईल. महानगरपालिकेने माझ्या पत्राची दखल घेत जलसंधारण विभागाकडे पाठपुरावा सुरू केला आहे, ही समाधानाची बाब आहे. पावसाळा सुरू होण्यापूर्वी हा गाळ काढला जावा, यासाठी माझा पाठपुरावा शेवटपर्यंत सुरू राहील, असे आमदार अमित गोरखे यांनी स्पष्ट केले आहे.

या निर्णयामुळे पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता निर्माण झाली असून, जलसंधारण विभाग यावर आता काय पाऊल उचलते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# आयुक्तांची जनगणना प्रशिक्षण केंद्रास भेट

## प्रशिक्षण प्रक्रियेचा आढावा; अचूक व वेळेत जनगणना पूर्ण करण्याच्या सूचना

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या जनगणना प्रशिक्षण मोहिमेअंतर्गत आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी डॉ. विजय सूर्यवंशी यांनी आज ड क्षेत्रीय कार्यालय, प्रभाग क्रमांक २६ मधील कै. मारुती गेनू कस्पटे प्राथमिक शाळा येथे आयोजित प्रशिक्षण केंद्रास भेट देऊन प्रशिक्षण प्रक्रियेचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी उपायुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार तसेच चार्ज अधिकारी तथा क्षेत्रीय अधिकारी पूजा दुधनाळे उपस्थित होते.**



आयुक्तांनी प्रगणक, पर्यवेक्षक आणि फील्ड ट्रेनर्स यांना दिल्या जाणाऱ्या मार्गदर्शनाची माहिती जाणून घेतली. प्रशिक्षणाची गुणवत्ता, कार्यपद्धती आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीबाबत समाधान व्यक्त करत त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांचे कौतुक केले.

प्रशिक्षणादरम्यान कर्मचाऱ्यांना जनगणना प्रक्रियेतील विविध टप्पे, घरगुती सर्वेक्षणाची पद्धत, अचूक माहिती संकलन तसेच नागरिकांशी प्रभावी संवाद याबाबत मार्गदर्शन केले जात असल्याचे त्यांनी पाहिले. तसेच डिजिटल साधनांचा वापर, ॲप-आधारित डेटा एन्ट्री आणि माहिती पडताळणी प्रक्रियेवर दिला जाणारा भर त्यांनी विशेषत्वाने नोंदवला.

संवाद साधताना आयुक्तांनी जनगणना प्रक्रिया अचूक, पारदर्शक आणि वेळेत पूर्ण करण्यासाठी सर्वांनी समन्वयाने काम करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सर्व महापालिका अधिकारी व कर्मचाऱ्यांनी जनगणना स्वयं-नोंदणी करण्याचे आवाहन केले.

या प्रशिक्षणामुळे प्रगणक व पर्यवेक्षक अधिक सक्षम होत असून आगामी जनगणना प्रक्रियेसाठी ते आत्मविश्वासाने सज्ज होत असल्याचे अधोरेखित करण्यात आले. महापालिकेच्या या उपक्रमामुळे शहराच्या विकासासाठी आवश्यक असलेली अचूक लोकसंख्यात्मक माहिती संकलित होण्यास मोठी मदत होणार आहे.

जनगणनेचा पहिला टप्पा १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत पार पडणार असून त्यासाठी तीन दिवसीय प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. अ, ब, क, ड, ग आणि ह क्षेत्रीय कार्यालयांमध्ये आजपासून प्रशिक्षणास सुरुवात झाली असून इ आणि फ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये उद्यापासून प्रशिक्षण सुरू होणार आहे.

जनगणना ही केवळ आकडेवारी संकलनाची प्रक्रिया नसून भविष्यातील विकासाचे दिशानिर्देशन करणारा महत्त्वाचा आधार आहे. त्यामुळे प्रत्येक प्रगणक व पर्यवेक्षकाने अत्यंत जबाबदारीने, अचूकतेने आणि पारदर्शकतेने माहिती संकलन करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षणाच्या माध्यमातून त्यांना केवळ तांत्रिक बाबींचेच नव्हे, तर नागरिकांशी प्रभावी संवाद साधण्याचे कौशल्यही दिले जात आहे. डिजिटल प्रणालींचा योग्य वापर करून ही प्रक्रिया अधिक जलद, सुलभ आणि विश्वासार्ह करण्यावर आमचा विशेष भर आहे, असे उप आयुक्त तथा शहर जनगणना अधिकारी सचिन पवार यांनी यावेळी सांगितले.

> जनगणना हे अत्यंत महत्त्वाचे राष्ट्रीय कार्य असून त्यावर देशाच्या विकासाचे नियोजन अवलंबून असते. त्यामुळे प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून अचूक व प्रामाणिक माहिती संकलनावर भर द्यावा. आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत पारदर्शक आणि गुणवत्तापूर्ण जनगणना पूर्ण करणे आवश्यक आहे.
>
> **- डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त तथा प्रधान जनगणना अधिकारी, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

> जनगणना प्रशिक्षणामुळे प्रगणक आणि पर्यवेक्षकांना प्रत्यक्ष कामकाजासाठी आवश्यक कौशल्ये आत्मसात करता येत आहेत. यामुळे माहिती संकलन अधिक अचूक, जलद आणि प्रभावी होण्यास मदत होईल.
>
> **- कुलदीप जंगम, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका.**

# ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं; आयपीएस डॉ. महेश भागवत

**महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड**

**स्पर्धा परीक्षांची तयारी करत असताना चालू घडामोडींची माहिती ठेवण्यासाठी दररोज काटेकोरपणे वृत्तपत्र वाचन करण्याची गरज आहे. तसेच शैक्षणिक अभ्यास आणि अवांतर वाचन सातत्याने सुरु ठेवावे. मी मराठी वाङ्मय आणि इतिहास हा विषय घेऊन यूपीएससी ची परीक्षा उत्तीर्ण झालो. ज्ञानाला भाषेचं बंधन नसतं हे माझे स्पष्ट मत आहे. जर स्पर्धा परीक्षेत अपयश आले तर आपल्याकडे प्लॅन बी तयार असला पाहिजे असे मार्गदर्शन तेलंगणाचे अतिरिक्त पोलीस महासंचालक डॉ. महेश भागवत यांनी पीसीसीओई मध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधताना केले.**



पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजीनियरिंग मध्ये डॉ. महेश भागवत यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह देऊन भागवत यांचे स्वागत केले. यावेळी उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे व अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी, पीसीयू नियामक मंडळ सदस्य सचिन इटकर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट विभागाचे अधिष्ठाता डॉ. शितल कुमार रवंदळे आदी उपस्थित होते.

डॉ. महेश भागवत यांनी सांगितले की, नागरिकांना पोलिसांकडून खूप अपेक्षा आहेत. परंतु पोलीस यंत्रणेवर देखील खूप कामाचा ताण आहे. सध्या पोलिसांकडे २५ टक्के गुन्हे हे सायबर क्राईमचे नोंद होत आहेत. या विषयी नागरिकांमध्ये जागृती होणे गरजेचे आहे. आपल्या परिसरातील जागरूक नागरिकांनी पोलिस मित्र म्हणून काम करावे असे आवाहन डॉ. भागवत यांनी केले.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे यांनी सांगितले की, डॉ. महेश भागवत हे १९९५ मध्ये दुसऱ्या प्रयत्नात आयपीएस परीक्षा उत्तीर्ण होऊन देशसेवेसाठी रुजू झाले. त्यांनी नक्षलवाद्यांचं पुनर्वसन, मानवी तस्करी रोखणे, त्यांचं पुनर्वसन करणे, बाल मजुरांची सुटका करून त्यांच्यासाठी शाळा सुरु करणे, सायबर क्राईम सारख्या गुन्ह्यांचा कार्यक्षम तपास करणे अशा अनेक जबाबदाऱ्या पूर्ण केल्या आहेत. भारतीय प्रशासनामध्ये सामाजिक भान असलेला संवेदनशील, कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून त्यांची ओळख आहे याचा अभिमान वाटतो असेही ज्ञानेश्वर लांडगे यांनी डॉ. भागवत यांचा सत्कार करताना सांगितले. प्रास्ताविक डॉ. गिरीश देसाई, सूत्र संचालन माधुरी ढमाले यांनी मानले. समारोप सत्रात पीसीईटीच्या इन्फिनिटी कम्युनिटी रेडिओला भेट देऊन डॉ. भागवत यांनी श्रोत्यांशीहि मनमोकळा संवाद साधला.




# Time Management: Importance and way to achieve for student



Time management is one of the most important skills for students, especially in schools where academic pressure, extracurricular activities, and personal responsibilities must be balanced effectively. Learning how to manage time wisely not only helps students perform better in exams but also reduces stress and builds discipline.Effective time management is one of the skills every student shall learn and use througout his school and in future professional life.

**1. HELPS IN BEING ORGANISED**

Time management helps students stay organized. When students plan their daily schedule, they can allocate proper time for studies, homework, revision, and relaxation. This prevents last-minute cramming before exams, which often leads to confusion and anxiety. A well-structured timetable ensures that every subject gets equal attention.

**2. IMPROVES PTODUCTIVITY**

It improves productivity. Students who manage their time efficiently can complete their tasks faster and with better concentration. For example, studying in focused time blocks without distractions like mobile phones or television can significantly improve understanding and retention of concepts. This is especially useful for senior classes students, where conceptual clarity is very important.

**3.STRESS REDUCTION**

Another key benefit is stress reduction. When students have a clear plan, they feel more in control of their workload. Instead of feeling overwhelmed by multiple assignments or exams, they can tackle each task step by step. This leads to better mental health and a more positive attitude and easy flow towards studies.

Time management also helps in maintaining a healthy balance between academics and personal life. Students should not only focus on studies but also give time to hobbies, sports, and family. Activities like reading, playing, or exercising refresh the mind and improve overall performance.

**4. MICRO MANAGEMENT**

To practice effective time management, students can follow simple steps such as setting daily goals, prioritizing important tasks, avoiding procrastination, and reviewing their progress regularly. Using tools like planners or to-do list s,backlog from last day ,syllabus tracking can also be very helpful.

CONCLUSION

In conclusion, time management is not just about studying more, but about studying smart. It is a lifelong skill that helps students




succeed not only in school but also in future careers and personal life. By managing time effectively, Students can achieve their goals with confidence and ease. This skills will always be useful.for their personal and professional aspect of future life too.

**Pravin Maheshkar**
**PRO**
**Priyadarshani School, Moshi.**